# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 17.09.2024** **वारः मंगळवार**

---

1. पुणे हुबळी, कोल्हापूर पुणे, नागपूर सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेसचं पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून लोकार्पण
2. हैदराबाद मुक्ती संग्राम दिनानिमित्त आज राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन
3. गणेशोत्सवाच्या आनंदपर्वाची आज सांगता; गणेश विसर्जन मिरवणुका सुरळीत पार पाडण्यासाठी यंत्रणा सज्ज आणि
4. आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय पुरुष संघ अंतिम फेरीत दाखल

**वंदेभारत**

राज्यातल्या तीन वंदे भारत एक्सप्रेसचा प्रारंभ काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरस्थ उपस्थितीत करण्यात आला. पुणे हुबळी, कोल्हापूर पुणे आणि नागपूर सिकंदराबाद मार्गांवर या गाड्या धावतील. पुणे हुबळी वंदे भारत रेल्वेला नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पुण्यातल्या रेल्वे स्थानकावरुन रवाना करण्यात आलं. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. या गाडीमुळे राज्यातल्या प्रवाशांचा प्रवास सुखकर होईल असं फडणवीस यावेळी म्हणाले.......

पुणे हुबळी वंदे भारत आठवड्यातून तीनदा म्हणजे सोमवार, गुरुवार आणि शनिवारी पुण्यातून दुपारी सव्वा दोन वाजता सुटेल. हुबळीतून ही गाडी दर बुधवार, शुक्रवार आणि रविवारी पहाटे पाच वाजता सुटेल.

कोल्हापूर पुणे वंदे भारत एक्सप्रेसला रेल्वे राज्यमंत्री व्ही सोमण्णा यांच्या उपस्थितीत रवाना करण्यात आलं. खासदार धनंजय महाडिक यावेळी उपस्थित होते. काल या गाडीतून शालेय विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी मिरज स्थानकापर्यंत मोफत प्रवास केला. मिरज, सांगली आणि किर्लोस्करवाडी स्थानकात या गाडीचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. ही गाडी दर सोमवार, गुरुवार आणि शनिवारी सकाळी सव्वा आठला कोल्हापूर स्थानकातून सुटेल आणि प्रत्येक बुधवार, शुक्रवार आणि रविवारी दुपारी सव्वा दोनला पुणे स्थानकातून सुटेल.

नागपूर सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेसच्या उद्घाटन प्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन उपस्थित होते. कुठल्याही देशाच्या सर्वांगीण विकासात सार्वजनिक वाहतूक मार्गांचा विकास मोलाचा ठरतो असं राज्यपाल यावेळी म्हणाले. तर मध्य भारताच्या प्रवासी वाहतुकीसाठी वंदे भारत एक्सप्रेस महत्त्वाची असल्याचं गडकरी यांनी सांगितलं.

**मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन**

हैदराबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त आज राज्यात, प्रामुख्यानं मराठवाड्यातील विविध जिल्ह्यात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती संभाजीनगर इथल्या सिद्धार्थ उद्यानात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज ध्वजारोहण होणार आहे. नांदेडमधे पालकमंत्री गिरीश महाजन, हिंगोलीत पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण होणार आहे. नांदेडमध्ये राष्ट्रीय स्तरावर प्रावीण्य मिळवलेल्या खेळाडूंचा सत्कार केला जाणार आहे; तर हिंगोलीतही विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्यांचा सत्कार होणार आहे. परभणी जिल्ह्यात पेडगांव इथं मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांच्या जीवनावर आधारित छायाचित्रांचं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं आहे.

**पर्यावरण सत्कार**

जागतिक कृषी मंचातर्फे पर्यावरण रक्षण, शाश्वत विकास आणि हरित महाराष्ट्र यासाठी राज्य सरकारनं केलेल्या कामाची दखल घेण्यात आली आहे. या कामगिरीसाठी उद्या जागतिक बांबू दिनाचं औचित्य साधून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा सन्मान केला जाणार आहे. मुंबईत होणाऱ्या या कार्यक्रमाला 20 देशांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

पर्यावरण रक्षणासाठी त्वरीत कृतीची साद संयुक्त राष्ट्रांनी दिली होती. त्याला प्रतिसाद देणारा भारत हा पहिलाच देश ठरला असून महाराष्ट्र हे भारतातलं पहिलंच राज्य ठरलं आहे. राज्यानं पर्यावरण रक्षणासाठी पर्यावरण आणि शाश्वत विकास कृती समितीची स्थापना केली आहे. तसंच औष्णिक विद्युत प्रकल्पात 5 टक्के जैव इंधन वापराचे निर्देश देऊन त्यासाठी 11 लाख हेक्टर क्षेत्रावर बांबू लागवडीचा निर्णय घेण्यात आला आहे.

**स्वच्छता ही सेवा-नांदेड**

राज्यात आजपासून स्वच्छता ही सेवा अभियानाचा प्रारंभ केला जाणार आहे. महात्मा गांधीजींच्या जयंती दिनापर्यंत म्हणजेच 2 ऑक्टोबरपर्यंत गावागावांमधून हे अभियान राबवलं जाणार आहे. स्वच्छता प्रतिज्ञा घेऊन या मोहीमेला सुरुवात होईल.

**ईद**

ईद ए मिलाद उन् नबी अर्थात प्रेषित मोहम्मद पैगंबरांची जयंती काल राज्यात विविध ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली. नागपूरमध्ये ईदनिमित्त कृतज्ञता फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. परभणीत ईदनिमित्त दरवर्षीप्रमाणं विवाह सोहोळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. यात विवाह केलेल्या 40 जोडप्यांना संसारोपयोगी साहित्य मोफत देण्यात आलं.

**गणेश विसर्जन तयारी**

गणेशोत्सवाच्या आनंद पर्वाची आज अनंत चतुर्दशीला सांगता होत आहे. आपल्या लाडक्या गणरायाला वाजत गाजत, उत्साहात निरोप देण्यासाठी राज्यभरातल्या गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांनी जय्यत तयारी केली आहे. प्रशासनानंदेखील ठिकठिकाणी विसर्जनासाठी कृत्रिम हौद उभारले असून रस्त्यांची दुरुस्ती, वीजयंत्रणा, रुग्णवाहिका, विसर्जन मार्गांचं सुशोभीकरण यासह अन्य व्यवस्था सज्ज ठेवली आहे. पोलिस यंत्रणाही सुरक्षा व्यवस्था आणि वाहतूक नियंत्रणासाठी दक्ष आहे. गणेशोत्सव पर्यावरणपूरक ठरावा म्हणून विसर्जनाच्या ठिकाणी निर्माल्य कलश ठेवण्यात आले आहेत; तसंच मूर्ती संकलन केंद्रं स्थापन करण्यात आली आहेत.

पुण्यातली गणपती विसर्जन मिरवणूक तर वैशिष्ट्यपूर्ण आणि म्हणूनच संपूर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलेली. आज सकाळी दहा वाजता पुणे महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले महात्मा फुले मंडईतल्या लोकमान्य टिळकांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करतील आणि त्यानंतर विसर्जन मिरवणूकीला सुरुवात होईल. पुण्यातल्या विसर्जन सोहोळ्याच्या तयारीचा हा वृत्तांत.....

**यंदाच्या अकरा दिवसांच्या गणेशोत्सवाच्या चैतन्यमयपर्वाची आज अनंत चतुर्दशीच्या सुमुहूर्तावर सांगता होत आहे. पुण्याच्या वैभवशाली गणेश विसर्जन मिरवणूकीला सकाळी साडेदहा वाजता महात्मा फुले मंडई येथील लोकमान्य टिळकांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सुरवात होईल.मानाच्या पाचही गणपतींची आरती करून राजकीय आणि सामाजिक कार्यकर्ते मुख्य मिरवणूकीत सहभागी होतील. सनई चौघडा, बॅंडच्या सुरावटीत आणि ढोल ताशाच्या गजरात, लाडक्या बाप्पाला जल्लोषात भावपूर्ण निरौप देण्यासाठी गणेशभक्त तयारीला लागलेत. विसर्जन मिरवणूकीत ध्वनी प्रदुषण होऊ नये म्हणून, डीजेमुक्त मिरवणूका काढाव्यात असं आवाहन यापूर्वीच पुणे फेस्टीव्हलच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गणेश मंडळांच्या कार्यकर्त्यांना केलं आहे. तर विसर्जन मिरवणूक निर्विघ्नपणे पार पडावी म्हणून मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी प्रसाद पाठक, पुणे.**

दरम्यान, विसर्जन मिरवणूकीत आवाजाची पातळी योग्य राखली जावी यासाठी विसर्जन मार्गांवर ध्वनी पातळी मोजणारी पथकं तैनात करण्यात आली आहेत. ध्वनी पातळी नियमांचं उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळांवर कारवाई केली जाणार आहे. आरोग्याला हानीकारक असणाऱ्या लेझर आणि प्लाझ्मा लाइटिंगच्या वापरावरही यंदा बंदी घालण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री वयोश्री योजना**

सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी राज्यातल्या 6 लाख 25 हजार 139 ज्येष्ठ नागरिकांचे अर्ज पात्र ठरले आहेत. या योजनेअंतर्गत 65 वर्षांवरील पात्र ज्येष्ठ नागरिकांना एकवेळ एकरकमी 3 हजार रुपये अर्थसहाय्य दिलं जाणार आहे. या ज्येष्ठ नागरिकांना वयोमानपरत्वे येणारं अपंगत्व, अशक्तपणा यावरच्या उपाययोजनांसाठी आवश्यक सहाय्य साधनं खरेदीसाठी, मन:स्वास्थ्य केंद्र, योगोपचार केंद्रातल्या प्रबोधन आणि प्रशिक्षणाकरता हे अर्थसहाय्य मिळणार आहे.

**<u>आधार एसएससी</u>**

कर्मचारी निवड आयोगातर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या विविध टप्प्यांवर उमेदवारांची ओळख पटवण्यासाठी आधार क्रमांकाचा उपयोग करण्यास केंद्र सरकारनं संमती दर्शवली आहे. आयोगाच्या परीक्षा आणि प्रत्यक्ष भरतीच्या विविध स्तरांवरदेखील उमेदवाराची ओळख सिद्ध करण्यासाठी आधार क्रमांक वापरला जाणार असल्याचं यासंदर्भातल्या राजपत्रित अध्यादेशात म्हटलं आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवारांकडून गैरमार्ग अवलंबले जाण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सरकारनं हा निर्णय जाहीर केला.

**<u>शिक्षक पात्रता परीक्षा</u>**

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेसाठी अर्हताप्राप्त परीक्षार्थींनी 30 सप्टेंबरपर्यंत अर्ज करावेत असं आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं केलं आहे. ही परीक्षा 10 नोव्हेंबर रोजी दोन सत्रात होणार आहे. सर्व शाळांमधल्या पहिली ते आठवीपर्यंतच्या शिक्षण सेवक, शिक्षक पदावरील नियुक्तीसाठी ही परीक्षा उत्तीर्ण होणं अनिवार्य आहे. अधिक माहिती परीक्षा परिषदेच्या https://mahatet.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचं परिषदेचे उपायुक्त संजयकुमार राठोड यांनी कळवलं आहे.

**<u>हॉकी</u>**

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई हॉकी अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय पुरुष संघ अंतिम फेरीत पोहोचला आहे. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारतीय संघानं दक्षिण कोरियावर 4-1 असा विजय मिळवला. भारतातर्फे हरमनप्रीत सिंगनं दोन तर उत्तम सिंग आणि जरमनप्रीत सिंग यांनी प्रत्येकी एक गोल केला. आज अंतिम फेरीत भारताचा सामना चीनबरोबर होणार आहे. उपांत्य फेरीच्या दुसऱ्या सामन्यात चीननं पाकिस्तानचा शूट आऊटमधे 2-0 असा पराभव केला.

**<u>हवामान</u>**

राज्यात आज कोकणात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.

#